# बाळासाहेब वाघ यांची जयंती साजरी

**नाशिक : प्रतिनिधी**

**के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था व श्री. बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब देवराम वाघ यांची ९२ वी जयंती दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी संस्थेच्या प्रांगणात साजरी झाली. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश पाठक, चार्टर्ड अकाउंटंट व ज्येष्ठ विचारवंत तसेच ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर हे लाभलेले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद विश्वनाथ व्यवहारे, माजी प्राचार्य व अध्यक्ष न्यायमूर्ती रानडे संस्था निफाड यांनी भूषविले.**




दीपप्रज्वलन, संस्था गीत व भाऊंच्या जीवनावरील चित्रफीत याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. के. एन. नांदुरकर यांनी केले. प्रास्ताविक करताना त्यांनी भाऊंच्या जीवनाचा संपूर्ण आढावा घेतला. भाऊंचे सहकार व शिक्षण क्षेत्रातील कार्य, भाऊंची दूरदृष्टी व शिक्षण क्षेत्राबद्दल तळमळीने त्यांनी या क्षेत्रात केलेले बदल व त्यामुळे समाजाची झालेली प्रगती यावर त्यांनी प्रकाश टाकला. प्रास्ताविकानंतर कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचा परिचय करून देण्यात आला व त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष माननीय समीर वाघ यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. विजय पांडुरंग भाटकर यांनी भाऊंच्या जयंतीनिमित्त संदेश पाठविला होता. त्याचे डॉ. विलास पाटील यांनी वाचन केले. त्यामध्ये त्यांनी भाऊंच्या विज्ञानवादी विचारसरणीवर बोलून भाऊंची विज्ञान-तंत्रज्ञान व कृषी या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामांबद्दल सांगितले. भाऊंमुळे एक विज्ञानवादी आदर्श पिढी घडू शकली, असे भाटकर यांनी आपल्या संदेशातून म्हटले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना गिरीश कुबेर यांनी शिक्षण व विद्यार्थी हा माझा आवडीचा विषय आहे, असे म्हणून भारतीय शिक्षण व्यवस्थेबद्दल त्यांनी विवेचन केले.

विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारण्याची, विचार करण्याची कला अवगत करावी व संशोधनावर लक्ष कसे द्यावे या विविध मुद्द्यांवर त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रकाश पाठक यांनी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आपल्यामध्ये नेहमीच जिज्ञासा पेटवून ठेवली पाहिजे, प्रश्न विचारणारे विद्यार्थी व त्यांच्या शंकांचे निरसन करण्याची कुवत असणारे शिक्षक अशा पद्धतीचे वातावरण भाऊंनी या शिक्षण संस्थेत तयार केलेले आहे, असे त्यांनी म्हटले. सन्मानाने जगण्यासाठी सतत कष्ट घेण्याची तयारी सर्वांनी दाखवली पाहिजे. भाऊ सतत कष्ट घेत राहिले. नावापासून व प्रसिद्धी पासून दूर राहिले म्हणून त्यांच्या हातून हे महान कार्य घडू शकले. अशा शब्दात त्यांनी भाऊंचा गौरव केला. टॅलेंट टेक्नॉलॉजी व टॉलरन्स या त्रिसूत्रेनुसार सर्वांनी काम करावे व भाऊंचा वारसा पुढे चालवावा, असे त्यांनी सर्वांना आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी अजिंक्य वाघ यांनी आभार प्रदर्शन केले. सदर कार्यक्रमास खासदार श्री. भास्कर भगरे, खासदार शोभा बच्छाव, खासदार प्रकाश वाजे, आमदार सीमाताई हिरे, आमदार माणिकराव कोकाटे, आदरणीय नीलिमाताई पवार, विविध क्षेत्रांतील मान्यवर, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, के. के. वाघ शिक्षण संस्थेतील सर्व प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Gavkari 20-10-2024